वाढती विफलता अशा प्रसंगी केंद्र शासन शक्ती संपन्न व ताकतवान असणे काळाची गरज आहे. या गरजेला ओळखुनच लोकांनी २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत मतदान करून प्रभावशाली व स्पष्ट बहुमताच्या नरेंद्र मोदी शासनास निवडून दिले. लोकशाहीतील मतदानांचा होणारा बाजार आणि सत्तेचे राजकारण बाजुला ठेवून लोकांनी राष्ट्रहित लक्षात घेवून निर्णय घेतला. एक मजबूत व शक्तिशाली केंद्र शासनास निवडून दिले. दिल्ली, बिहार विधानसभा निवडणुकीतही लोकांनी हाच इशारा दिला. केंद्र शासनास मजबुत व शक्तिशाली बनवणे म्हणजे राज्य शासन कमकुवत करणे नाही. वास्तवतेत देश-प्रदेशाच्या समावेशक व शाश्वत विकासासाठी मजबूत संघात्मक व्यवस्था गरजेची आहे. भारतीय लोकशाही व संघराज्याची ही भविष्यातील गरज लक्षात घेवूनच लोकांनी निवडणुकात मतदान करावे. जेणेकरुन मजबूत केंद्र शासन भारतीय लोकशाहीस यशस्वी बनवेल.

**संदर्भ ग्रंथ :**

१) सुभाष काश्यप - हमारा संविधान - नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, २००८.

२) ग्रॅनव्हिल ऑस्टिन - अनुवाद - भारती केळकर - भारतीय राज्यघटना राष्ट्राची कोनशिला डायमंड पब्लिकेशन्स, पुणे-२०१३

३) डॉ.बी.एल.फाडिया - भारतीय शासन एवं राजनीति - साहित्य भवन पब्लिकेशन्स आगरा.

४) डॉ.भा.ल.भोळे-भारतीय गणराज्याचे शासन व राजकारण- पिंपळापूरे पब्लिकेशन अँड कंपनी, नागपूर.

५) माधव गोडबोले-अनुवाद-सुजाता गोडबोले-भारताच्या संसदीय लोकशाहीची अग्निपरीक्षा-राजहंस प्रकाशन, मे-२०१२.

६) M.Laxmikanth-Public Administration ५th Edition Tata Mc Graw - Hill Publishing company Limited New Delhi.

❑❑❑

**23**

# मराठीतील दलितस्त्रियांच्या आत्मकथनातील स्त्रीशक्तीचे दर्शन

**डॉ. सुनिता उम्रस्कर**
पदव्युत्तर मराठी अध्यापन व संशोधन विभाग,
गोवा विद्यापीठ
ताळगांव पठार, तिसवाडी, गोवा

***********

स्त्रीचे दु:ख हे मानवजातीच्या इतिहासाइतकेच सनातन आहे. त्याच्यावर आजमितीला अनेकांनी सृजनात्मक, समीक्षात्मक व संशोधनात्मक लेखन केले आहे. शतकानुशतके ही स्त्री प्रचंड मानसिक दडपणाखाली वावरत आहे आणि तेच आयुष्य हे नैसर्गिक आयुष्य म्हणून ती जगत आलेली आहे. भारतीय संस्कृतीमध्ये पुरुषप्रधान संस्कृतीचा स्त्रीमनावर अधिक पगडा आहे. या पुरुषप्रधान संस्कृतीने वेढलेल्या समाजामधील स्त्रियांना जाती-वर्ग, उच्च-निच परत्वे वेगवेगळी दु:खे, वेगवेगळे प्रश्न, वेगवेगळ्या समस्यांनी घेरलेले जाणवते. भारतीय समाजामध्ये स्त्रीला आजही दुय्यम स्थान आहे. परंपरेनूसार तिच्यावर झालेल्या संस्काराने ती परावलंबी बनली आहे. वैचारिक, मानसिक, आर्थिक, धार्मिक, सामाजिक परावलंबीत्व हीच आपली प्रतिमा आहे असे तिला वाटत आलेले आहे.

आज लेखनजगातामध्ये स्त्रीविषयक अनेक विचार पुढे येत असलेले दिसतात. स्त्रीवाद, स्त्रीमुक्तीवाद, स्त्री-पुरुष समानता, स्त्री स्वातंत्र्य अशा अनेक चळवळींचा विचार समाजवादी, मार्क्सवादी, उदारमतवादी, जहालवादी इत्यादी दृष्टीकोनातून निर्माण होताना दिसतो. या सगळ्या प्रवाहांना पाश्चात्य स्त्रीमुक्तिवादी चळवळीचे भक्कम पाठबळ असलेले जाणवते. १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय मुक्तीवर्ष म्हणून साजरे केले. पाश्चात्य स्त्रीचळवळ स्वातंत्र्याच्या जाणीवेची सुरवात स्त्रीला मतदानाचा हक्क मिळविणे यातून झाली. नंतर ही चळवळ शिक्षण, संपत्ती, समान कायदा इत्यादी प्रश्न घेऊन सर्वत्र पसरत गेली.

मराठी साहित्यक्षेत्रात 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' यासारखे आत्मचरित्र लिहिणाऱ्या रमाबाई रानडे, 'चरित्र

आत्मचरित्र' कार काशिताई कानिटकर या सार'या स्त्रिया ह्या समाजधुरिणी होत्या. स्त्रीशिक्षण हे समाजाला व कुटुंबाला कसे घडविणारे आहे हे या स्त्रियांनी जाणले होते. शिक्षणाविषयीची कळकळ या स्त्रियांच्या आत्मचरित्रातून व्यक्त होते. नवरा घरसंसार यापुरतेच या स्त्रिया आनंदाने जगू शकल्या असत्या तरीही स्त्रीमन समजून स्त्रियांच्या उन्नतीसाठी जगणे हेच त्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय बनविले. परंपरेने निर्माण केलेल्या स्त्रीउन्नतीच्या विरोधात असलेल्या प्रत्येक गोष्टीशी समर्थपणे त्या झुंज देतात. त्यांना घडवित असताना स्वत:लाही त्या घडवत जातात येथेच स्त्रीशक्ती दिसते. स्त्रीशक्तीचा पाया हा स्त्रीशिक्षणात आहे हे येथे स्पष्ट दिसते. १९१० मध्ये रमाबाई रानडे यांनी 'आमच्या आयुष्यातील काही आठवणी' हे आत्मचरित्र लिहून स्त्रियांच्या आत्मानुभावाला वाचा फोडली. त्यानंतर अनेक स्त्रियांनी आत्मचरित्रे लिहून मराठी आत्मचरित्रांचे दालन समृद्ध केले. ही वाटचाल दलित स्त्रीकडे पोहचण्यात अनेक दशके जावी लागली. अलिकडे स्त्रियांनी मोठ्या प्रमाणात साहित्य लेखन केलेले दिसते. मराठी साहित्यलेखनामध्ये आपला अनुभव प्रामाणिकपणे व्यक्त करण्यासाठी स्त्रीयांनी फार मोठ्या प्रमाणात मजल मारली. यामध्ये दलित स्त्रियांचे लेखन हे मराठी साहित्यजगतामध्ये फार मोठे दस्तऐवज ठरले. दलित साहित्याचे स्वरूप पाहता आज दलित स्त्री आपल्या लेखणीच्याद्वारे अधिक प्रगल्भपणे समोर आलेली जाणवते. स्त्रीच्या दु:खाच्या दोन तऱ्हा आहेत. एक मानसिक व दुसरी शारीरिक. एक आपल्या दु:खाला वाट करून न देता मानसिक कोंडमारा सहन करणारी व दुसरी शारीरिक अन्याय, अत्याचार सहन करणारी स्त्री. दलित स्त्री ही या दोन्हीही प्रकारच्या अत्याचाराला बळी पडलेली स्त्री आहे.

आधुनिक काळामध्ये स्त्रीला शिक्षण मिळू लागले. शिक्षणाने ती स्वावलंबी बनली पण समाजाला तिच्या स्वतंत्र अस्तित्वाची जाणीव झाली का? हा प्रश्न अजुनही अनुत्तरीत आहे. ज्या ज्या स्त्रिया अन्यायाविरुद्ध आवाज उठवून आपल्या हक्कासाठी, स्वातंत्र्यासाठी बाहेर पडलेल्या आहेत आणि त्यानी सशक्तपणे आपले हक्क मिळविले आहे तेथे तेथे ही स्त्रीशक्ती आढळते. शिक्षणाचा अभाव, पारतंत्र्य, प्रस्थापीत मुल्यव्यवस्था, दलितत्त्व इत्यादीतून ही स्त्री आज समर्थपणे बाहेर येते. जसाजसा काळ बदलला तशा तशा रूढी बदलल्या, जुने पारंपारिक संकेत मागे पडू लागले, नीतीअनीतीच्या कल्पना बदलल्या. आज जीवन झपाट्याचे बदलत आहे. शिक्षणाविषयी जाणीव, विज्ञानाचा उदय यामुळे सामाजिक व सांस्कृतिक बदल होत आहेत. अशा युगात वावरताना या स्त्रियांना आज आपल्या दुर्बलतेची जाणीव व्हायला लागली आहे. एक माणूस म्हणून सगळे हक्क व स्वतंत्र तिला हवे आहे. म्हणूनच अनेक माध्यमातून ती आज आपल्यासमोर येत आहे. अगदी निर्भयपणे, आत्मविश्वासाने ती सामोरे येत आहे. यामध्ये दलित स्त्रीही पुढे येत असलेली दिसते. शांताबाई कृष्णाजी कांबळे यांचे 'माझ्या जल्माची चित्तरकथा' हे आत्मकथन व उर्मिला पवार यांचे 'आयदान' या आत्मकथनामध्ये स्त्रीशिक्षण हेच प्रमुख सुत्र आहे. आपल्याला मिळालेल्या कनिष्ठतेच्या वागणूकीला ती विरोध करीत बसत नाही किंबहुना ती ते स्वीकारतही नाही, तर आहे त्या परिस्थितीत वाट काढून ती पुढी जाताना दिसते. काही अपवाद वगळता बहुतेक स्त्रियां शिक्षणाला विरोध करीत नाही तर हलाखीचे जीवन जगूनही शिक्षणाला महत्त्व देतात. यामध्ये स्त्रियांचा वाटा फार मोठा असलेला दिसतो.

दलित आत्मकथने ही केवळ या स्त्रियांची नसून तो सामूहिक जीवनाचा आविष्कार आहे. ही स्त्री ही या समाजाची प्रतिनिधिक आहे. या सगळ्या स्त्रियांच्या जीवनाच्या प्रेरणास्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत याचा उल्लेख या स्त्रिया अतिशय आदराने करतात. दलितत्त्व हे एक सामाजिक व धार्मिक व्यवस्थेचे द्योतक म्हणून शेकडो वर्षांपासून चालत आलेले आहे. दलित समजल्या जाणाऱ्या या माणसांचे जीवन एका भयावह अमानुषतेच्या छळाला बळी पडलेले जीवन आहे. या चौकटीतून बाहेर येणे हे सोपे नव्हते. त्यासाठी त्यांना एका ऊर्जाकेंद्राची गरज होती आणि हे ऊर्जाकेंद्र म्हणजे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे होत. पुरुषांबरोबर स्त्रीयांनाही ह्या मुक्तीलढ्यात त्यांनी सामावून घेतले.

शिक्षणाचे महत्त्व सांगून, अंधश्रद्धा नष्ट करून डोळसपणे आपल्या जीवनाकडेपाहण्याचा एका नवा दृष्टीकोन त्यांनी या स्त्रियांसमोर ठेवला. म्हणूनच या दलित स्त्रियांच्या आत्मकथनांमध्ये आंबेडकर हे त्यांचे दैवत बनले. ही या आत्मकथनांतील स्त्रियांच्या उन्नतीची एक बाजू तर दुसरी बाजू पुरुषप्रधान संस्कृतीला सामोरी जाणारी. परंपरेतून चालत आलेले हे जीवन बदलणे केवळ डॉ. आंबेडकरांमुळे शक्य झाले. माणसाची माणूस म्हणून अस्मिता अन आत्मप्रतिष्ठा जागी करण्याचा श्रेय डॉ. आंबेडकरांकडे जाते. आंबेडकर चळवळीचा परिणाम स्वरूप दलित स्त्रियांनी आपल्यातील माणूस जागवला. येथे या स्त्रिया एकीकडे सामाजिक मानसिकतेत बदल घडवून आणू

इच्छितात त्याचबरोबर स्वत:चा विकास साधून स्वत्वाची जोपासना करतात. अज्ञान, निरक्षरता, अतोनात दारिद्रय, बेकारी, कष्ट या सगळ्यावर मात करून मानवमुक्ती लढ्यात स्वत:ला झोकून देतात. या आत्मकथनांचा महत्त्वाचा भाग म्हणजे आत्मभान जागृत झालेल्या या स्त्रिया आहेत. त्यांचे अनुभवविश्व समृद्ध होत गेलेले दिसते.

आपल्यामधील उणिवांची कारणे ती शोधत जाते. ती कुढत बसत नाही. तिचे जीवन प्रवाही आहे. सकारात्मक दिशेने झालेले हे परिवर्तन आहे. तिचा संघर्ष आपल्या समाज व कुटुंबाबरोबर आहेच तसा स्वत:शीही आहे. म्हणून ही स्त्री कोणत्याही इतर पांढरपेशा मध्यमवर्गीय स्त्रीपेक्षा अधिक सक्षम व सशक्त वाटते. प्राप्त परिस्थितीला तोंड देताना ह्या स्त्रिया सहनशील व संयमी वाटतात. त्या तुटत नाहीत, कोसळत नाहीत. शुन्यातून वर येऊन स्वसामर्थ्याने यशस्वी
होणे यामध्येच या स्त्रियांची शक्ती दिसते.

भारतीय संस्कृती ही पुरुषप्रधान संस्कृती असल्याने साहित्यातून ती अनेकदा व्यक्त होते. पुरुषप्रधान विचारप्रणाली, मूल्यव्यवस्था, कार्ययंत्रणा याने दबलेली स्त्री व्यक्त होऊ इच्छिते. ही स्त्री ज्यावेळी व्यक्त होऊ लागली ती अवस्था म्हणजे तिला झालेली आपल्या अस्तित्वाची जाणीव. हे स्त्रीनिर्मित साहित्य स्त्रीविशिष्ट अनुभवविश्व व स्त्रीभाषा घेऊन अवतरते. नकळतपणे ती पुरुषप्रधान संस्कृतीचा दंभस्फोट करून अर्थनिर्णयन व मूल्यमापन करते. ही स्त्री पुरुषाला कनिष्ठ बनवत नाही तर पुरुषाचे हितसंबंध राखून स्वत:ला घडवू इच्छिते. दलित साहित्य हे पुरुषप्रधान संस्कृतीतूनच निर्माण झालेले साहित्य आहे. किंबहूना दलित समाज संस्कृतीतून ते निर्माण झाले आहे.

दलित साहित्याद्वारे दलित समाज व्यक्त करणे हा हेतू असला तरी दलित स्त्रियांच्या आत्मकथनांतून दलित समाजाबरोबर स्त्रीजीवन व्यक्त झालेले आहे. ही आत्मकथने पाहता पुरुषप्रधान संस्कृती त्याची विचारप्रणाली व मूल्यव्यवस्थेला ही स्त्री बळी पडलेली आहे. असे असूनही पुरुषप्रधान संस्कृती, विचारप्रणाली व मूल्यव्यवस्था यांचा प्रतिकार करणे वा विरोध करणे हे दलित स्त्रियांच्या आत्मकथनांचे उद्दीष्ट नव्हे. एक स्त्री म्हणून घेतलेले स्त्रीविशिष्ट अनुभवांचा आविष्कार हे साहित्य घडविते. स्त्रीजीवनाच्या अस्सलपणाचा आविष्कार हे या साहित्याचे एक श्रेष्ठ मूल्य आहे. दलित स्त्री ही दलितेतर स्त्रीप्रमाणे पुरुषप्रधान संस्कृतीमध्ये दबली गेलेली स्त्री आहे. आर्थिक भार कमी करण्यासाठी ती घराबाहेर पडत असली तरी तीचे घरातील स्थान दुय्यम दर्जाचे आहे. दलितत्त्व हे कायम स्वरूपी तिच्यावर जन्माने लादल्यामुळे तिला घराबाहेरही हीन वागणूक दिली जाते.

दलित स्त्रियांच्या या आत्मकथनांतून भूतकालीन व वर्तमानकालीन समाज-संस्कृतीतील पुरुषसत्ताक संस्कृतीचे वर्चस्व नाकारलेले आहे. पुरुषप्रधान संस्कृतीशी लढत असता नकळतपणे ह्या स्त्रिया या जोखडातून बाहेर पडू इच्छितात. पुरुषप्रधान संस्कृतीच्या मर्यादांचे उ'घन करताना सहजपणे स्वत:ला घडवत जातात. समाजाला व प्राप्त परिस्थितीला तोंड देता देता त्यांच्यामध्ये एक सहज बंडखोरी निर्माण होत जाते. त्यांच्यासमोर एक ध्येय आहे.

समाजाशी संघर्ष करताना अनुभवातून निर्माण झालेली ती विचारप्रणाली आहे. 'जिण आमुचं' मध्ये महार स्त्रीजीवनाचे चित्र अतिशय विदारकपणे चित्रित केले आहे. पाच-सहा वर्षांच्या मुलींची लग्ने, त्यांचा सासरी होणारा अनन्वित छळ, सुनेच्या पायात खोडा घालणे, नाक कापणे अशा क्रूर प्रथांना बळी पडणाऱ्या स्त्रीचे जीवन चित्रित केले आहे.

'आयदान' किंवा 'माज्या जल्माची चित्तरकथा' पाहता ह्या स्त्रियां दलितत्त्वाच्या अमानुषतेबरोबर पुरुषप्रधान संस्कृतीच्या जाचाला बळी पडलेल्या दिसतात. आत्मविश्वास ढळू न देता यातून बाहेर पडण्याचा मार्ग शोधताना दिसतात. या सगळ्या पारंपरिक संकेत व्यवस्थांच्या दबावाखालून सुटण्याचे त्यांचे आवाहन अत्यंत महत्त्वाचे वाटते.

'आयदान' व 'माज्या जल्माची चित्तरकथा'मध्ये आलेली उर्मिला पवार व शांताबाई कांबळे यासार'या स्त्रिया या सगळ्या रुढी परंपरा झुगारून देताना दिसतात. पुरुषप्रधान संस्कृतीला त्या नाकारतात. शांताबाई कांबळे ही नवऱ्याने दुसरे लग्न केल्यानंतर त्याला नाकारते. तेथे कुठेही ती कोसळत नाही. अगदी शांतचित्ताने ती त्याला आपल्या समर्थपणाची ताकीद देते. या स्त्रियांनी घरातील दुय्यम स्थान नाकारलेले आहे. या स्त्रिया स्वत:चे निर्णय स्वत: घेते. 'आयदान' मधील उर्मिला पवार नवऱ्याच्या परवानगीशिवाय एम. ए. चे शिक्षण पुर्ण करते. ती त्याच्या विरोधाला जुमानत नाही. घर, संसार , मुले सगळे सांभाळूनच ती शिक्षण पुर्ण करते. रात्र रात्र जागवून अभ्यास करते.

घरातील मुलींच्या लग्नाविषयीचे निर्णय ती आपल्या नवऱ्याचा विरोधात जाऊन मुलींच्या बाजुने घेते व मुलीला म्हणजेच

एका स्त्रीला तीचे निर्णय घेण्यास मदत करते. पुरुषप्रधान संस्कृतीचे चटके कुठल्याही जातीतील, वर्गातील, धर्मातील, स्त्रियांची सुटका झालेली नाही. ह्या स्त्रियांचे एक वैशिष्ट्य म्हणजे दलित व दलितेतर स्त्री असा संघर्ष नाही तर उच्चवर्णीय समाजाने त्यांच्यावर लादलेली व्यवस्था व या दलित समाजाचे जीवन. दारिद्र्य व भूख यांनी पिचलेली ही माणसे व या समाजातील स्त्री हे दलितत्त्वा बरोबरच पुरुषप्रधान संस्कृतीची बळी ठरलेली आहे. भारतीय स्त्रीजीवन व भारतीय समाजमन याचे विदारक दर्शन या आत्मकथनांतून घडते. केवळ स्त्री म्हणून लादलेले जीवन ती नाकारते. परंपरेने घालून दिलेल्या नियमानुसार न जगता स्वत: एक माणूस म्हणून जगायच्या अधिकाराची तिला जाणीव होते तेव्हाच ती बंडखोर बनते. समाजाने घालून दिलेल्या

नियमाविरुद्ध जाण्याची भाषा ती करते. ती बंडखोरी नसून आपल्या हक्काची जी जाणीव आहे. मुळातच तिला आपला हक्क मागावा लागतो येथेच पुरुषप्रधान संस्कृतीची हार आहे. तिला साहजिकपणे एक माणूस म्हणून जगता का येऊ नये ? हा सतत भेडसावणारा एक प्रश्न आहे. तिला हक्क हवा असेल तर तिला संघर्ष करावा लागतो. येथेच स्त्रीची शोकांतिका आहे. परंपरेने लादलेले नियमधर्म, आचारधर्म बाजूला करून आज ती सक्षमपणे उभी राहू इच्छिते. ही स्त्री ही समाजाने लादलेली जातीव्यवस्था नाकारते. 'आयदान' मध्ये आलेली स्त्री ही बौद्ध धर्म स्वीकारते व परंपरने लादलेल्या जोखडातून कायमची मुक्त होउ पाहते. बौद्ध धर्म स्वीकरल्यामुळे परंपरेने आलेल्या धार्मिक विधी, कर्मकांडाचे थोताड झुगारून देते. बहुतेक दलित स्त्री ही अंधश्रद्धाळू असलेली दिसते. उर्मिला पवार याला अपवाद आहे. अंधश्रद्धेवर भुताखेतांवर, कर्मकांडावर ती विश्वास ठेवत नाही. ती अधिक विज्ञानाच्या जवळ जाणारी वाटते. येथे ही स्त्री एक सशक्त आई आहे. ती आपल्या मुलांना वाटेल ते कष्ट करून शिकविते. उर्मिला पवार आपल्या मुलांना डॉक्टर करू इच्छिते व समर्थपणे आपल्या मुलीनांही पुर्ण शिक्षण देते. ही स्त्री ही समर्थपणे स्त्री मुक्ती चळवळीमध्ये सहभागी होते. आणि आपल्या सारख्या अनेक स्त्रियांना मुक्त करू इच्छिते. परंपरेच्या प्रवाहात स्वत:ला लोटून देणे हे सोपे असते तर परंपरेविरुद्ध पोहणे हे खूप कठिण असते. याचा प्रत्यय ही आत्मकथने वाचताना येतो.

बेबी कांबळे सारखी स्त्री वैयक्तिक जाणिवेच्या मर्यादा पार करून सामाजिक जीवन जाणिवा व्यक्त करताना दिसते. हे सगळे जीवन व्यक्त करताना या स्त्रिया निर्भिड व परखड वाटतात. यामध्ये समाजाने त्यांच्यावर लादलेल्या जीवनाविषयीची वेदना आहे, तसेच यातून बाहेर येण्यास ती विद्रोह करते, प्रस्थापित समाज व्यवस्था ती नाकारते कारण तिला एक नवीन समाज व्यवस्था स्विकारायची असते. हा स्त्रीशक्तीचा लढा हा केवळ आर्थिक आणि राजकीय बाबतीतल्या स्वातंत्र्याचा लढा नव्हे तर हा लढा हा सामाजिक व सांस्कृतिक लढा आहे. केवळ स्त्रीला आर्थिक दृष्टया समर्थ बनविणे व तिला मतदानाचा हक्क देणे येथेच हा लढा थांबणार नाही तर समाजामध्ये तिला असलेले अनादाराचे स्थान व संस्कृतिने तिच्यावर लादलेली गुलामगिरी याच्यातून ती जेव्हा मुक्त होईल तेव्हाच खऱ्या अर्थाने ती सशक्त बनली असे आपल्याला म्हणता येईल. स्त्रीमुक्ती पेक्षा दलितमुक्तीसाठी केलेला हा लढा आहे.

स्त्रीला आज सगळ्या दिशा मोकळ्या आहेत, पण तरीही मर्यादा आहेच. यांचे मुख्य कारण म्हणजे सामाजिक व आर्थिक विषमतेने गासलेला समाज. हा समाज एकसंघ नाही. एकात्म नाही. केवळ दलितच नव्हे तर कुठल्याही स्तरावरील स्त्री ही आजही गुलामीचेच जगणे जगत आहे. भारतीय स्त्री ही चूल आणि मूल यांच्या जबाबदाऱ्यांचे ओझे घेऊन जगत आहे. ती अजूनही कोंडलेल्या अवस्थेत आहे. दलित स्त्रियांची ही आत्मकथने पाहता ही स्त्री या कोंडीतून बाहेर येऊ इच्छिते.

ज्यांचे माणूसपणच नाकारले गेले आहेत असा दलित समाज आज कित्येक वर्षे अन्याय, अत्याचाराखाली वावरत आहे. दलित स्त्रियांची आत्मकथने वाचताना जाणवते की या समाजातील स्त्रीचे दु:ख तर अधिकच भयावह आहे. स्वातंत्र्यानंतर या स्त्रीला भारतीय राज्यघटनेने स्वातंत्र्य दिले, समानता दिली. सामाजिक, आर्थिक व राजकीय क्षेत्रात परिवर्तन झाल्याने आज स्त्री-जीवन झपाट्याने बदलत आहे. पण एक गोष्ट लक्षात येते की या परिवर्तनाच्या दीशा आजही तशा गुंतागुंतीच्या वाटतात. किंवा त्या अतिशय संथ आहेत. भारतीय घटनेनुसार अस्पृश्यता नष्ट केली पण स्पृश्यता मनातून जाणे किती अवघड आहे हे प्रत्येकाला जाणवते. तसेच स्त्री-पुरुषांना समान हक्क घटनेने प्राप्त केले, परंतु तिला समानतेने वागवणे हे समाजाला सोपे जात नाही. तिला माणूस म्हणून वागवताना अवघड वाटते.

स्त्री ही केवळ पत्नी, माता, अशा नात्यातून बाहेर पडत आहे. हे आपल्याला 'आयदान' या आत्मकथनातून आढळते. आज

स्त्री ही स्वातंत्र असली तरी तिला मिळालेल्या हक्काचा उपयोग ती करू शकत नाही. भारतीय घटनेनुसार तिला राजकीय हक्क मिळालेला आहे. पण अजूनही समाजात तिला दुय्यम स्थान आहे. पूर्वी आर्थिक ओढाताणामुळे दलित स्त्री घराबाहेर पडत होती. आज दलितेतर स्त्रीही आर्थिक स्वातंत्र्यासाठी घराबाहेर पडलेली आहे.

आपण स्वातंत्र आहोत, माणूस आहोत याची जाणीव आज तीला झालेली आहे. या दलित म्हणून समजल्या जाणाऱ्या स्त्रिया शिकल्या. त्यांच्यासमोर स्त्रीमुक्ती चळवळ हा हेतू नव्हता तर समाजापासून दलितत्व नाकारणे हा होता. शांताबाई कांबळे यांच्या 'माज्या जल्माची चित्तरकथा' मध्ये शिक्षिका म्हणून असलेली शांताबाई कांबळे यांचे जीवन दलित म्हणून अतिशय कष्टाचे असते. केवळ आपल्या आत्मविश्वासाच्या व चिकाटीच्या बळावर ती अधिकाऱ्याच्या पदापर्यंत पोचते. यामध्ये तिच्या आईचे फार मोठे योगदान आहे. मरताना आपल्या मुलीला शिकवा असे आश्वासन आपल्या नवऱ्याकडून घेते. प्रसंगी ऋण काढून तिला शिकवले जाते. लग्नानंतरच्या काळातही नवऱ्याची साथ तिला मिळत नाही तरीही स्वतःच्या बळावर स्वतःचा विकास साधते.

या स्त्रियांकडे असणारी आत्मियता, तटस्थता ही स्त्रीशक्तीचीच रुपे होत. जिण आमुचं मध्ये बेबी कांबळे म्हणतात, ' कळाय लागल्यापासून संकटाच्या खाणीत तयार झालेलं खालच्या वर्गातील बायकांचं जीवन आहे. शरीराला त्यांनी हिमालयाला टक्कर घेण्याची सवय लावली आहे. पण शरीरातील मन ही जी चीज आहे ती मात्र रात्रंदिन आकांत करते होती. स्त्री म्हणजे सत्य शिलाची पुतळी आहे. ज्यानी घडवलं त्यालाच मान खाली घालया लावणारी नीती कन्या आहे. चातुर्वणांनी जसी जाती भेदाची निर्मिती केली तशीच ह्या लबाड विश्वकर्त्यानं बायकांना पुरुषाच्या आधारावर मरून तीन दिवस जगण्याचा पायंडा घातला आणि नरानी नारीवर कायमचं वर्चस्व ठेवलं. घटनेची अशी चौकट निर्माण केली की नारीनीच नारीवर हरप्रकारे जुलूम करत रहावं. पण नारी ही नारीच आहे. नारी ही संकटाची पुतळी आहे. नारी ही वनवासाची माता आहे. नारी हीच नराला जन्म देणारी आणि आपल्या रक्तापासून अन्यायाच्या पुतळ्याला जगवणारी प्रत्येक देवळातील भूतलावरील अंबा आहे. अनेक वर्षांच्या अग्नीकुंडात धगधगून अखेर तिन दिव्य ज्योतीलाच जन्म दिला ' (जिणं आमुचं, बेबी कांबळे, सुगावा प्रकाशन, पुणे, २००८ पृ. ८०, ८१) या आत्मकथनात वैयक्तिक संदर्भ येत नाहीत. समाजाचे चित्रण करण्याच्या ओघाने आपले शालेय जीवन व आई वडील यांचे जीवन येते. या आत्मकथानामध्ये आलेले समाज जीवन रुढी परंपरा, अंधश्रद्धा, अज्ञान यांनी भरलेले आहे. यामध्ये असलेले विवाह विधी, उत्सव याबरोबरच अतिशय हलाखीचे स्त्रीजीवन त्यांचा सासुरवास, बाळंतपण, पायात खोडा घालून ठेवीपर्यंत त्यांना लावले निर्बंध या सगळ्या अन्याय अत्याचाराचे वर्णन करणारी लेखिका ही याच समाजाची एक घटक आहे.

आत्मकथने ही आत्मविश्लेषणात्मक, आत्मपरिक्षणात्मक असली तरी ही आत्मकथने आत्मशोधाबरोबरच सामाजिक दस्ताऐवज व व्यक्ती विकास साधणारीआहेत. स्त्रियांच्या या लेखनाद्वारे एक स्त्रीमन समजासमोर येत असलेले दिसते. हे स्त्रीमन इतर स्त्री समूहास उपयुक्तव मार्गदर्शक ठरणारे आहे. या स्त्रियां केवळ आपले कुटुंब सांभाळत नाहीत तर राजकीय सामाजिक चळवळीमध्ये एक व्यक्ती म्हणून सक्रिय सहभागी होऊन दलित स्त्रीचे नेतृत्व करताना दिसतात. उदा. 'आयदान', 'जीण आमुचं' ही आत्मकथने. ही केवळ एक जाणीव नाही तर एकंदरीत या स्त्रीने जुनी मूल्यव्यवस्था नाकारून नवीन मूल्यव्यवस्था स्वीकारलेली आहे व हे तिचे यश आहे.

या आत्मकथनांचे वैशिष्ट्य म्हणजे या आत्मकथनांमध्ये आत्मप्रौढी किंवा स्वसमर्थन आढळत नाही. उर्मिला पवार अतिशय विनोदबुद्धीने स्वतःवर झालेले अन्याय व्यक्त करते. तर शांताबाई कांबळे अतिशय संथपणे आपले जीवनानुभव व्यक्त करतात. बेबी कांबळे यांनी आंबेडकर विचारधारेला बळकटी आणलेली दिसते. तिच्यातील आक्रमकता ही एखाद्या माणसाच्या आयुष्याची झालेली फरफट व अन्याय यातून निर्माण झालेल्या वेदनेचा हुंकार आहे. या स्त्रियांच्या वाट्याला दुय्यमत्त्व, गौणत्त्वा बरोबरच समाजामधील हीनत्वही वाट्याला आलेले असले तरीही ह्या स्त्रियांमध्ये कुठेही न्यूनगंड, लाचारी जाणवत नाही. भविष्याची स्वप्ने पाहत चिकाटीने व जिद्दीने ती पुढे जातात.

दुबळेपणा, नाजुकपणा, असमर्थपणाचे बुरखे फाडून ही स्त्री बाहेर येते. येथे बेबी कांबळे असो, शांताबाई कांबळे असो किंवा उर्मिला पवार असो ह्या स्त्रिया करुणेची दयेची अपेक्षा करीत नाहीत तर वाचकांना जीवनाकडे पाहण्याची एक नवी दृष्टी देतात. वाचकांना जीवनमूल्यांची जाणीव करून देण्याचे सामर्थ्य त्यांच्या लेखनात दिसते. तेच स्त्रीच्या शक्तीचे द्योतक आहे.

या स्त्रियांचे दुःख वेगळे आहे. पोटाची भूख ही मुलभूत

गरज भागवणे हाच मुळातील जेथे प्रश्न आहे तेथे स्त्रीत्व, स्त्रीवाद याला कुठे थारा असणार पण तरीही ह्या स्त्रीया खंबीरपणे आपले स्त्रीत्व जोपासतात. उपेक्षा, अवहेलना व दारिद्रय या शिवाय ज्याच्या वाट्याला काहीही आलेले नाही अशा माणसांची ही कथा आहे. या स्त्रिया अनेक प्रकारचे कष्ट, अपमान सहन करून कौटुंबिक ताणतणावांना सामोरे जात स्वत:चे शिक्षण पूर्ण करतात. आपल्या आत्मकथनातून आपल्या दु:खाला ह्या स्त्रिया कधीच गोंजारत नाहीत. सतत पुढे पुढे जाणाऱ्या या स्त्रिया आहेत.

आत्मकथनांच्या शेवटी आपली मुले किती शिकली ती कशी सुव्यवस्थित आहेत हे सगळे सांगताना त्याचे मन गर्वाने भरून येते. प्रत्येक दु:खाच्या तऱ्हा वेगवेगळ्या आहेत, परंतु या सगळ्या दु:खातून त्या बाहेर पडलेल्या आहेत आणि समाधानी आहेत. ही स्त्री स्वत:चे रक्षण करणारी स्त्री आहे. अर्थार्जनासाठी ती घराबाहेर पडणारी स्त्री आहे. वैदिक संस्कृतीने स्त्रीचे अस्तित्व नाकारले होते. धार्मिकतेच्या नावाखाली तिला शिक्षण, स्वातंत्र्य, हक्क यापासून वंचित केले गेले होते. या आत्मकथनांतून ही स्त्री केवळ आपल्या जीवनात आलेल्या दु:खाचे कथन करीत जाते. त्यांचे दु:ख हे दुहेरी आहे.

एक स्त्री म्हणून आलेले दु:ख व दुसरे दलित स्त्री म्हणून वाट्याला आलेले दु:ख. एक दु:ख संस्कृतीने लादलेले एक दु:ख समाजाने लादलेले. आपल्या पूर्व परंपरा व समाज याच्यातून वाट काढीत ही स्त्री पुढे येतेच पण त्याचबरोबर या दु:खातून समाजालाही बाहेर काढू इच्छिते. मानवी मूल्यांचा पुरस्कार करते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करून आपली स्वत:ची अस्मिता सांभाळून यशाचे शिखर गाठणाऱ्या या स्त्रियांनी लेखनामध्येच नव्हे तर आपल्या समाजामध्ये मिळविलेले स्थान अत्यंत प्रेरणादायीच ठरणारे आहे.

* * * * *

24

# आदिवासीचे आत्मभान जागविणारे कुसूम अलाम यांचे 'रान आसवांचे तळे'

प्रा.डॉ.श्याम मोहरकर
एफ.ई.एस.गर्ल्स् कॉलेज, चंद्रपूर

**********

**प्रस्तावना :**

सुसंस्कृत समाजापासून दूर असलेल्या डोंगराळ प्रदेशात, जंगलात वस्ती करून राहणारे बांधव हे आदिवासी म्हणून ओळखले जातात. नागर संस्कृतीपासून दूर आणि अलिप्त राहिलेल्या, संबंधित प्रदेशातील मूळचे रहिवासी असलेल्या व प्राचीन काळापासून भारतात वास्तव्यास असलेल्या आदिवासींची संस्कृती ही एकोप्याने राहणारी पर्यावरणवादी संस्कृती आहे. ही संस्कृती मातृपूजक आणि मातृसत्ताक आहे. मातृभूमी, मातृशक्ती आणि मायबोलीचा आदर करणारी आहे.

आदिवासी साहित्य हा स्वतंत्र वळणाचा साहित्यप्रवाह मराठी वाङ्‌मयात १९७० च्या आसपास दाखल झाला आणि मराठी वाङ्‌मयाच्या कक्षा अधिक विस्तीर्ण झाल्या. त्यापूर्वी रानावनात राहणारा आदिवासी- त्याचे दु:ख, व्यथा, वेदना, आशा-आकांक्षा, किर्रर रानातच गडप झाल्या होत्या. या आदिवासी साहित्यावर भाष्य करतांना डॉ. विनायक तुमराम म्हणतात - ''पहाडांच्या कुसाकुसात आणि काटेरी झुडुपांच्या वरच्या वस्त्यांत ज्यांच्या आयुष्याचा प्रत्येक क्षण बेडीबंद झाला अशा आरण्यकांना मुक्तीचा श्वास देणारे साहित्य म्हणजे आदिवासी साहित्य होय.''[१] जगात जेथे आदिवासी समूह राहतात, त्यांचेशी जुळलेले सर्व साहित्य हे आदिवासी साहित्यातच समाविष्ट असते. आजवर अव्यक्त असलेल्या वेदनाविश्वाचे दर्शन घडवून देणारे हे साहित्य आहे. प्राचीन काळापासून आदिवासी साहित्य हे त्यांच्या संघर्षाची गाथा आहे. मानवतेशी नाते सांगणारे हे साहित्य मराठी साहित्यविश्वात मुक्तपणे नैसर्गिक भावनांचा आविष्कार करणारे साहित्य आहे.

आदिवासी साहित्यात कविता हा वाङ्‌मयप्रकार प्रथम अभिव्यक्त झाला. आज बहरलेल्या, फुललेल्या आदिवासी साहित्याचे अस्तित्व बीज आदिवासी कविता आहे. ही कविता